मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर २०२३ । पान १

# उद्योगनगरीची सांस्कृतिक नगरीकडे वाटचाल

## अजित पवार यांच्या हस्ते शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

नाटक हे मराठी माणसाचं पहिलं प्रेम आहे. त्यामुळे नाट्य चळवळ आजही जिवंत आहे. मराठी नाटकांना विष्णुदास भावे यांच्यापासून पावणे दोनशे वर्षांची परंपरा असल्याचं सांगितलं जात असली तरी; मराठी नाटकांची पाळंमुळं स्वराज्य संकल्पक शाहाजीराजे भोसले यांच्या काळात तंजावर येथील 'लक्ष्मी नारायण मंगलम्' या नाट्य कलाकृती पासूनची म्हणजे चारशे वर्ष जुनी आहेत. पिंपरी -चिंचवड हे शहर उद्योग नगरी म्हणून ओळखले जाते. पण आता उद्योग नगरीची वाटचाल ही सांस्कृतिक नगरीकडे होतीये, अशा भावना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केल्या. अखिल भारतीय मराठी नाट्य



परिषदेच्या वतीने ६ आणि ७ जानेवारी २०२४ रोजी पिंपरी चिंचवड मध्ये ऐतिहासिक शंभरावे नाट्यसंमेलन होणार आहे. या नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज (दि.२५) हॉटेल ग्रँड एक्झाँटीका, आकुर्डी येथे करण्यात आले. यावेळी अजित पवार बोलत होते. या प्रसंगी नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, डॉ. पी. डी. पाटील, कृष्णकुमार गोयल, नाना काटे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, कविता अल्हाट, राजेशकुमार साकला, सचिन इटकर, शत्रुघ्न काटे, योगेश बहल, अजित गव्हाणे, गणेश घुले, राहुल भोसले, पुणे जिल्ह्यातील नाट्यपरिषदेचे पदाधिकारी, सुरेश धोत्रे, दिपालीताई शेळके, मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजेभोसले व पिंपरी चिंचवड शाखेचे, किरण येवलेकर, सुहास जोशी, राजेंद्र बंग, मनोज डाळिंबकर, प्रणव जोशी, आकाश थिटे, संतोष रासने, सुदाम परब, संतोष पाटील, कविता आल्हाट आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, जेव्हा आपण विकास झाला आहे असे म्हणतो, तेव्हा तो सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. यामध्ये सांस्कृतिक आणि सामाजिक विकास देखील अंतर्भूत आहे. पुण्याची ओळख ही विद्येचे माहेरघर म्हणून आहे. तर पिंपरी-चिंचवड हे शहर उद्योग नगरी म्हणून ओळखली जाते. पण आता उद्योग नगरीची वाटचाल ही सांस्कृतिक नगरीकडे होतीये. यापूर्वी देखील या उद्योग नगरीने नाट्यसंमेलन आणि साहित्य संमेलन उत्साहात पार पाडले आहे. त्यामुळे यंदाचे १०० वे नाट्य संमेलन देखील तितक्याच उत्साहात आयोजित केले जाईल याची मला खात्री आहे. पूर्वीच्या काळी तमाशा आणि नाटक हे दोनच कलाप्रकार मनोरंजनाची साधनं होती. ग्रामीण भागात तमाशा आणि शहरी भागात नाटकं अधिक लोकप्रिय झाली. नाटकांनी केवळ मनोरंजनच केले नाही. तर अनेक राजकीय, सामाजिक, कौटुंबिक प्रश्नांना हात घालून त्यांच्यावर भाष्य देखील केलं. कोरोंना काळात नाटकं बंद झाली होती. अनेकांचे संसार उघड्यावर आले होते. पण आमचे सरकार त्यांच्या मागे उभे राहिले, असे ही अजित पवार यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले, यंदा संमेलनासाठी १० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामधून नाट्य परीषदेच्या राज्यभरातील विविध शाखांना वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करता येतील. तसेच जो निधी राखून ठेवला आहे. त्यांच्यावरील व्याजातून देखील चांगल्या पद्धतीने काम करता येईल. यंदाच्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल आहेत, त्यांच्यामुळे हे संमेलन अधिक ऊंचीवर जाईल असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक करताना नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर म्हणाले,१०० वे संमेलन घेण्याची संधी आम्हाला मिळाली हा योगायोग नाही तर १९९६ पासूनची २७ वर्षांची आमची मेहनत आहे.

# महाराष्ट्रातील पहिलीच सामाजिक सलोखा आरक्षण परिषद यशस्वी

## प्रत्येक व्यक्तीला सरकारने रोजगार हक्क दिला पाहिजे : प्रा. सुभाष वारे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्यात आरक्षणाच्या मागणीने जोर धरला असून मराठा, ओबीसी, धनगर समाजासह विविध समाज वेगवेगळी आंदोलने करत आहेत. विविध समाजाचे नेते चिथावणीखोर वक्तव्य करत आहेत. त्यामुळे समाजात जाती जातीत तेढ वाढत आहे. ती कमी व्हावी व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा यासाठी महाराष्ट्रात प्रथमच सामाजिक सलोखा आरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजक प्रकाश जाधव यांनी प्रास्ताविक मनोगतात सांगितले. रविवारी (दि.२४) आयोजक प्रकाश जाधव आणि पिंपरी चिंचवड शहरातील विविध पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या सामाजिक संस्था, संघटनांच्या वतीने अत्रे सभागृहात सामाजिक सलोखा आरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन प्रा. सुभाष वारे यांच्या हस्ते करण्यात आले. मानव कांबळे अध्यक्षस्थानी होते. डॉ. शिवानंद भानुसे यांनी सांगितले की, केंद्र सरकारने घटना दुरुस्ती करून आरक्षण मर्यादा ५० टक्के पेक्षा जास्त वाढवावी. मराठा समाज ओबीसी वर्गात आरक्षण मिळण्याच्या सर्व अटी पूर्ण करतो. त्यामुळे ओबीसी प्रवर्गात वर्गवारी करून मराठा समाजास आरक्षण द्यावे. वर्गवारी विषयाची संकल्पना माननीय रोहिणी आयोगाने मांडली आहे. असे केल्याने मराठा समाज व ओबीसी समाज दोघांनाही न्याय मिळेल असे डॉ. भानुसे यांनी सांगितले.

प्रा. सुभाष वारे म्हणाले की, कलम ४१ नुसार भारतात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला सरकारने रोजगार हक्क दिला पाहिजे. आरक्षित प्रवर्गाच्या त्या वर्गातील अंतर्गत आरक्षण नीट होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी सरकारची आहे. तशीच सामाजिक संघटना त्यांचे प्रतिनिधी कार्यकर्ते यांचीही आहे. अधिकाधिक गरजूंना आरक्षण मिळाले पाहिजे. आरक्षणाच्या कक्षेत काही राहणार नाही. तर भांडणे कशासाठी. खाजगीकरण, कंत्राटी कामगार या प्रकारे रोजगार निर्मिती केली जात आहे. त्यामुळे आरक्षणाचा फायदा मिळत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यापुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. याचाही अभ्यास करण्याची गरज आहे जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे असे प्रा. वारे यांनी सांगितले.

प्रवीण दादा गायकवाड यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळण्यातील अडचणी सांगितल्या. इडब्ल्यूएस मधून मराठा समाजाने आरक्षण घ्यावे तसेच उद्योग, व्यवसायामध्ये मध्ये यशस्वी होऊन सर्व जगभर उद्योगाचे जाळे निर्माण करून प्रगती करावी असे प्रवीण दादा गायकवाड यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर ठाकरे गटात?

## संजोग वाघेरे, उद्धव ठाकरे भेटीमुळे अजित पवारांना धक्का

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे पिंपरी-चिंचवड शहरात असतानाच त्यांना मोठा धक्का बसला आहे. शहराचे माजी महापौर आणि राष्ट्रवादीचे नेते संजोग वाघेरे यांनी मुंबईत मातोश्री या निवासस्थानी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची सदिच्छा भेट घेतली. वाघेरे लवकरच ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात चालू आहेत. त्यामुळे अजित पवार गटाला धक्का बसणार असल्याचं बोललं जात आहे. वाघेरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली तेव्हा खासदार संजय राऊत, ठाकरे गटाचे राज्य संघटक एकनाथ पवार, ठाकरे गटाचे शहरप्रमुख सचिन भोसले, जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, योगेश बाबर उपस्थित होते. दरम्यान, या भेटीवर आणि वाघेरे यांच्या ठाकरे गटातील



प्रवेशाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले, राजकारणातले लोक नेहमीच एकमेकांच्या भेटी घेत असतात. अशी भेट काही आज झालेली नाही. हे आधीपासूनच चालत आलं आहे. शिवसेना, राष्ट्रवादी किंवा भाजपात (महायुती) इकडची उमेदवारी कोणाला देणार याची चाचपणी एखाद्याने केली असेल. एखाद्याला वाटत असेल की आपण खासदार व्हावं, याबाबतची चाचपणी त्याने केली असेल. कोणाला आमदार व्हायचं आहे, तर कोणाला खासदार व्हायचं आहे. इकडे आपल्याला तिकीट मिळणार नाही असं वाटलं असेल, त्यामुळे तिकडे गेले असतील. कदाचित शिवसेनेत (ठाकरे गट) तिकीट मिळेल असं वाघेरे यांना वाटलं असेल. त्यामुळे उमेदवारीच्या हेतूने काहीजण तिकडे गेले असतील असं म्हणत अजित पवार यांनी सांगितलं की, अलीकडच्या काळात त्यांचं संजोग वाघेरे यांच्याशी संभाषण झालेलं नाही. ते म्हणाले, मी संजोग वाघेरे आणि उद्धव ठाकरे यांचा एकत्र फोटो पाहिला आहे. वाघेरे इथे (पिंपरीत) आल्यावर मी त्यांना विचारेन. प्रत्येकाला व्यक्तीस्वातंत्र्य आहे. मताचं स्वातंत्र्य आहे. महाविकास आघाडीकडे उमेदवार नाही. त्यामुळे वेगवेगळ्या भागातले उमेदवार घेण्याचा त्यांचा प्रयत्न चाललाय. वाघेरे हे मावळमधून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी जोरदार तयारी केली होती. पण, ऐनवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना उमेदवारी मिळवून दिली. त्यामुळे वाघेरे यांना माघार घ्यावी लागली होती. आता महायुतीत मावळची जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळण्याची शक्यता असल्याने वाघेरे यांनी ठाकरे गटाच्या पर्यायाची चाचपणी सुरु केल्याचं बोललं जात आहे. राष्ट्रवादीतील फुटीनंतर वाघेरे हे अजित पवार यांच्या गटात होते. अजित पवार आज पिंपरीत असतानाच वाघेरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने अजितदादांना धक्का बसण्याची शक्यता आहे. वाघेरे यांना ठाकरे गटाकडून मावळमधून उमेदवारी मिळणार असल्याची जोरदार चर्चा आहे.

### एखाद्याला वाटत असेल की आपण खासदार व्हावं

» वाघेरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली तेव्हा खासदार संजय राऊत, ठाकरे गटाचे राज्य संघटक एकनाथ पवार, ठाकरे गटाचे शहरप्रमुख सचिन भोसले, जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, योगेश बाबर उपस्थित होते. दरम्यान, या भेटीवर आणि वाघेरे यांच्या ठाकरे गटातील प्रवेशाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले, राजकारणातले लोक नेहमीच एकमेकांच्या भेटी घेत असतात. अशी भेट काही आज झालेली नाही. हे आधीपासूनच चालत आलं आहे. शिवसेना, राष्ट्रवादी किंवा भाजपात (महायुती) इकडची उमेदवारी कोणाला देणार याची चाचपणी एखाद्याने केली असेल. एखाद्याला वाटत असेल की आपण खासदार व्हावं, याबाबतची चाचपणी त्याने केली असेल.

# अरविंद एज्युकेशन सोसायटीत वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

## अर्जुन पुरस्काराने सन्मानित शांताराम जाधव यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटी प्रशालेच्या लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन विद्यालय व लिटल फ्लॉवर ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव डॉजबॉल, हँडबॉल, थ्रो बॉल, लंगडी, धावणे, रिले आदी विविध क्रीडा कौशल्यांनी उत्साहात साजरा केला. अर्जुन पुरस्काराने सन्मानित शांताराम जाधव, एनसीसी लीडर मेजर किशोर पाटील,



कबड्डीपटू राजेश सावंत यांच्या हस्ते कै. नानासाहेब शितोळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून व मशाल प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवास सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, भारतीय विद्यानिकेतन प्रशालेच्या मुख्याध्यापिका आशा घोरपडे, लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुलच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य शीतल मोरे, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरीच्या मुख्याध्यापिका पिंकी माणिकम, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, क्रीडाशिक्षक अक्षय नाईक, क्रीडाशिक्षिका सुषमा पवार, तसेच पालक, विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, एनसीसी परेड घेण्यात आली. क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी खेळाविषयी शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी डॉजबॉल, हँडबॉल, थ्रो बॉल, धावणे, रिले, लंगडी या खेळांमध्ये मोठा सहभाग नोंदवत आपले नैपुण्य दाखविले. तसेच सूर्यनमस्कार, लाठी-काठी, हुला हुप्स, फ्लॅग ड्रील, कराटे, स्केटिंग, बुद्धिबळ, कॅरम याची उत्कृष्ट प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते विजेते खेळाडू व संघांना चषक, पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच 'कै. नानासाहेब शितोळे चॅम्पियन चषक'ही प्रदान करण्यात आला. तसेच मेजर किशोर पाटील यांनीही विद्यार्थ्यांना खेळाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. आरती राव यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व समजावून सांगत खेळासोबत सकस आहार घेऊन तंदुरुस्त राहण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांना आपण आनंदी असेल, तरच आपले आरोग्य चांगले राहते आणि त्याच्यासाठी खेळाची अत्यंत गरज असल्याचे सांगितले. प्रणव राव यांनी सांगितले, की उत्कृष्ट खेळाडू होण्यासाठी विद्यार्थ्यांनी खेळाचा नियमित सराव करणे, तसेच एकजूट राखणे अत्यावश्यक आहे. क्रीडाशिक्षक अक्षय नाईक व क्रीडाशिक्षिका सुषमा पवार यांनी खेळातील बारकावे सांगत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# राज्यावर जलसंकट : अजित पवार

## सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट ओढावले असल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सोमवारी दिली. पिण्यासाठी पाणीपुरवठा प्राधान्याने करण्याची सूचना राज्याच्या जलसंपदा विभागाला दिली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. जुलै २०२४ पर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवले जाईल. त्यासाठी मार्च महिन्यात कालवा समितीची बैठक होईल, असेही त्यांनी जाहीर केले. अजित पवार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उर्वरीत महाराष्ट्रात पाण्याचे साठे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. यंदा



पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये पाणीसाठ्याबाबत आढावा घेतला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात यावे, त्यानंतर शेतीला पाणी द्यावे, अशी सूचना जलसंपदा विभागाला केली आहे. त्यानुसार जलसंपदा विभागाकडून नियोजन सुरू झाले आहे, असे त्यांनी सांगितले. खरीपाच्या पिकांनुसार एप्रिल, मे, जून आणि जुलै या चार महिन्यांपर्यंत पाणीसाठा पुरवावा लागले. त्यासाठी मार्च महिन्यात कालवा सल्लागार समितीची बैठक घेतली जाईल. त्यामध्ये उपलब्ध पाणीसाठा, वाटप, गळती, चोरी आणि पाण्याचे बाष्पीभवन या बाबींचा विचार केला जाईल, असेही ते म्हणाले. अपुऱ्या पर्जन्यमानाचा पिकांना फटका बसला आहे.

राज्यातील १४ जिल्हे आणि ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून केंद्राच्या दुष्काळी पथकाने त्यासंदर्भातील सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार ४० तालुक्यांसाठी २५०० कोटी रुपयांची राज्य सरकारकडून मागणी करण्यात आली आहे. विशेषतः केंद्र सरकारच्या निकषानुसार जे तालुके दुष्काळात येत नाही. मात्र, प्रत्यक्षात महसुली मंडळांमध्ये ज्यांचा दुष्काळी भागात समावेश होतो, त्यांच्यासाठी महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, जलसंधारण मंत्री, कृषी मंत्री यांची विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीच्या तपासणीमध्ये नव्याने १२०० मंडळांमध्ये दुष्काळ असल्याचे समोर आले आहे. राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट ओढावले असल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सोमवारी दिली. पिण्यासाठी पाणीपुरवठा प्राधान्याने करण्याची सूचना राज्याच्या जलसंपदा विभागाला दिली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. या मंडळांमध्ये केंद्र सरकारने ज्या सवलती दिल्या आहेत, त्याच सवलती आपत्ती व्यवस्थापन तसेच मदत आणि पुनर्वसन विभागाला राज्याच्या धर्तीवर देण्यात येणार आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले.

### प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य

» राज्यातील दुष्काळी परिस्थिती, विदर्भ आणि मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ, गौण खनिज आदी प्रश्नांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.अजित पवार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उर्वरीत महाराष्ट्रात पाण्याचे साठे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. यंदा पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये पाणीसाठ्याबाबत आढावा घेतला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात यावे, त्यानंतर शेतीला पाणी द्यावे अशी सूचना जलसंपदा विभागाला केली आहे.

# खासगी बालवाड्यांवर आता सरकारचे नियंत्रण!

## २०२० नुसार पूर्वप्राथमिक शिक्षणात समानता आणण्यात येणार

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार पूर्वप्राथमिक शिक्षणात समानता आणण्यात येणार आहे. त्यासाठी खासगी बालवाड्यांची मान्यता, किमान सुविधा, अभ्यासक्रम या संदर्भात नियंत्रण आणण्यासाठीच्या नियमावलीचा मसुदा शिक्षण विभागाने तयार करून राज्य शासनाला सादर केला आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात खासगी बालवाड्यांवर नियंत्रणाचे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. राज्यात शासकीय अंगणवाड्यांसह खासगी बालवाड्या अक्षरशः गल्लोगल्ली आहेत. मात्र त्यावर कोणतेही शासकीय नियंत्रण नाही. बालवाडी सुरू करण्यासाठीची मान्यता प्रक्रियाही सध्या अस्तित्वात नाही. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार पूर्वप्राथमिक



शिक्षण आता शिक्षणाच्या चौकटीत आणण्यात आले आहे. तसेच पूर्वप्राथमिक ते दुसरीसाठीचा राज्य स्तरावरील अभ्यासक्रमही तयार करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आता राज्यातील खासगी बालवाड्यांवर सरकारी नियंत्रण आणण्यात येणार आहे. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, की खासगी बालवाड्यांवर नियंत्रण आणण्याबाबतच्या नियमावलीचा मसुदा तयार करून काही दिवसांपूर्वी राज्य शासनाला सादर करण्यात आला. तज्ज्ञांच्या मदतीने सखोल अभ्यास करून ही नियमावली तयार करण्यात आली आहे. त्यात मान्यता प्रक्रिया, अभ्यासक्रम, किमान सुविधा यावर भर देण्यात आला आहे. खासगी बालवाड्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने होणाऱ्या शिक्षण प्रक्रियेत समानता आणण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या नियमावलीचे विधेयक तयार होऊन येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर या नियमावलीची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

# पुढच्या निवडणुकीत शिरूरमधून आमचाच उमेदवार

## अजित पवार यांचे अमोल कोल्हेंना आव्हान

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिरूर लोकसभेसाठी आमच्याकडे पर्यायी उमेदवार आहे. पुढच्या निवडणुकीत आमचा उमेदवारी आम्ही निवडूणच आणू, असे जाहीर करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरूर लोकसभेचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांना आव्हान देऊ केले आहे. पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे पदयात्रा काढणार आहेत. यासंबंधीचा प्रश्न अजित पवारांना विचारला असता त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर टीका केली. निवडून आल्यानंतर दीड वर्षातच त्यांनी (कोल्हे) राजीनामा देण्याची तयारी दर्शविली होती. आता निवडणूक जवळ आल्यानंतर त्यांना पदयात्रा सूचत आहे, असा आरोप अजित पवार यांनी केला. शिरुरच्या खासदाराने पाच वर्ष स्वतः:च्या मतदारसंघात लक्ष दिले असते तर खूप बरे झाले असते. त्या खासदारांनी दीड वर्षापूर्वी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली होती. त्यांना निवडून आणण्यासाठी मी आणि दिलीप वळसे पाटील यांनी जीवाचे रान केलेले होते. त्यांना खासगीत समोरासमोर बोलवा, मग आम्ही काय ते सांगू. ते मधल्या काळात त्यांच्या लोकसभेतील सहा विधानसभा मतदारसंघात फिरकतही नव्हते. तसेच त्यांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली होती. मी एक कलावंत असून माझ्या सिनेमावर परिणाम होत आहे. माझा सिनेमा फ्लॉप गेला. माझ्या कुटुंबावर आणि आर्थिक परिस्थितीवर परिणाम झाल्याचे या खासदारांनी आम्हाला सांगितले होते. मी हे कधी बोलणार नव्हतो. पण निवडणूक आल्यामुळे त्यांना एक एक गोष्टी सुचायला लागल्या आहेत. त्यामुळे बोलायला लागत आहे, अशा शब्दात अजित पवार यांनी अमोल कोल्हे यांच्यावर टीका केली. पुण्यात माध्यमांशी बोलत असताना अजित पवार पुढे म्हणाले की, कुणाला संघर्ष यात्रा सुचतेय, कुणाला पदयात्रा सुचतेय. आता काहीही काढा. लोकशाही आहे, प्रत्येकाला आपापली भूमिका घेण्याचा अधिकार आहे. मीदेखील शिरूर लोकसभेच्या सहा विधानसभा मतदारसंघात जाऊन लोकांना आवाहन करणार आहे की, विद्यमान खासदारांना तुम्ही कितींदा मतदारसंघात पाहिले ते सांगा. मागच्या वेळी उमेदवारी देत असताना आम्ही योग्य व्यक्तीला उमेदवारी दिली होती. पण नंतर त्यांनी वेगळी भूमिका घेतली. निवडून आल्यानंतर मतदारसंघात फिरावं लागतं, लोकांची कामं करावी लागतात. पण हे खासदार पहिल्या वर्षातच ढेपाळले आणि राजीनाम्याची गोष्ट करू लागले. आम्हाला वाटलं त्यांचं वक्तृत्व चांगले आहे, उत्तम कलाकार आहेत. छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका त्यांनी उत्तमरित्या निभावली होती.



### अमोल कोल्हे पदयात्रा काढणार

**» मालिकांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. म्हणून आम्ही त्यांना उमेदवारी दिली. पण आता शिरूर लोकसभेसाठी आमच्याकडे पर्यायी उमेदवार आहे. पुढच्या निवडणुकीत आमचा उमेदवारी आम्ही निवडूणच आणू, असे जाहीर आव्हान अजित पवार यांनी खासदार अमोल कोल्हे यांना दिले. पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे पदयात्रा काढणार आहेत. यासंबंधीचा प्रश्न अजित पवारांना विचारला असता त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर टीका केली.**

# पुरंदर विमानतळ झाल्यास पुणे देशाचे ग्रोथ इंजिन बनेन

## राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मत

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुण्याच्या वेगवान विकासासाठी नवे विमानतळ आवश्यक आहे. त्यामुळे पुरंदर येथील नवीन विमानतळ व्हायला हवे. हे विमानतळ झाले तर, पुणे हे देशातील महत्त्वाचे ग्रोथचे इंजिन बनेन आणि ते मुंबईची जागा घेईन,असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (ता.२५) येथे एका जाहीर कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे आयुक्त राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, दैनिक पुढारीचे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, दैनिक लोकमतचे संपादक संजय आवटे, दैनिक सकाळचे संपादक सम्राट फडणीस, भगवती ग्रुपचे बाबासाहेब औटी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष किरण जोशी आदी उपस्थित होते. फडणवीस पुढे म्हणाले, ''येत्या २० वर्षातील देशाचे ग्रोथ इंजिन होण्याची पुण्याची आणि 'पीएमआरडीए'ची क्षमता आहे. पुणे शहर हे नव्या युगाचे उद्योग समाविष्ट करण्याची क्षमता असणारे शहर आहे. यासाठीच रिंगरोडसारखे विकासाचे प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्यात येत आहेत. पुण्याच्या वेगवान विकासासाठी नवे विमानतळ आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांना याबाबतच्या शंका असल्यास, त्यांचे निरसन करण्यात येईन. विमानतळासाठी जमीन दिलेल्यांना समृद्ध होण्याचा अनुभव येईन, असे पॅकेज दिले जाईन.'' दरम्यान, पत्रकारांना स्वस्तातील घरे मिळावीत, यासाठी गृहकर्जावरील व्याजावर सवलत देण्याची योजना जाहीर करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात येईन. कारण पत्रकारांच्या अनेक अडचणी आहेत. त्यांची स्वत:ची हक्काची घरे आढळून येत नाहीत. त्यामुळे मोहीम म्हणून पत्रकारांच्या घराचा प्रकल्प हाती घ्यावा लागेल. माध्यमांची संख्या आणि प्रकार वाढले आहेत.